भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)

11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001

फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

अफजल गुरुच्या फाशीबद्दल पाकिस्तानी संसदेच्या ठरावाचा निषेध करण्याची मागणी.

विरोधी नेते(श्री अरुण जेटली) – साहेब, मला बोलायला दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. पाकिस्तानच्या एका गंभीर घटनाक्रमाकडे मी आपले लक्ष केंद्रित करु इच्छितो. भारतीय संसदेवर झालेल्या हल्ल्यातील दोषी अफजल गुरुला दिलेल्या फाशीचा निषेध केलेल्या पाकिस्तानी संसदेच्या ठरावाचा हा मुद्दा आहे. पाकिस्तानच्या राजकारणात आलेले हे अधिकृत निवेदन आहे. आतापर्यंत पाकिस्तानी सैन्य, गुप्तचर विभाग आयएसआयच्या निवेदनाने आपण आश्चर्यचकित होत होतो, पण पाकिस्तानी संसदेतील ठराव हा भारतावरील सर्वात खराब दहशतवादी हल्ल्याचे समर्थन असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे.

आतापर्यंत आपण बोलत होतो की, भारतीय संसदेवरील हल्ल्याचे षडयंत्र हे सीमेपलिकडून घडविण्यात आले होते. त्याबाबतचा पुरावा पण आपल्याकडे आहे. भारतीय संसदेवर झालेल्या हल्ल्याचा दोषी अफजल गुरुला दिलेल्या फाशीचा निषेध करण्याचा पाकिस्तानी संसदेने मंजुर केलेला ठराव हा आपल्या वक्तव्याचे सज्जड समर्थन आहे. आपल्या सैनिकांचा शिरच्छेद, हैद्राबादमधील बॉम्बब्लास्ट आणि श्रीनगरमध्ये सीआरपीएफ कँप वरील हल्ला त्या ठरावाला आणि पाकिस्तानची नियत स्पष्ट करते. सरकारने आता या परिस्थितीत पाकिस्तान बरोबर कशा प्रकारे वर्तन केले पाहिजे हे गंभीरपणे विचारले पाहिजे. भूतकाळात पंतप्रधानांनी सांगितले होते की, आम्ही मैत्री साठी एक पाउल पुढे यायला तयार आहोत.

पाकिस्तानच्या अशा उकसावणा-या कृत्यानंतर आपण कशाप्रकारे मैत्रीचा हात पूढे करु शकतो...पाकिस्तान खरे तर मैत्रीच्या लायकच नाही. ठरावाची गोष्ट केली तर जो देश आपल्यावरील दहशतवादी हल्ल्याला पाठिंबा देतात त्यांच्याबरोबर वाटाघाटी कशा प्रकारे करु

शकता....मी असे मानतो की आता आपल्याला पाकिस्तान बरोबर चर्चा बंद करायला पाहिजे. दोन्ही देशातील संबंध सद्भावपूर्ण बनायला पाहिजे असे आपल्याला वाटते परंतु पाकिस्तान अशा प्रकारे ठराव करतो. अशा परिस्थितीत संबंध सामान्य होणे शक्यच नाहीत. आपला देश गंभीर परिस्थितीचा सामना करत आहे.

मी समजतो की विदेश नीती बाबत चर्चा करण्याची गंभीर आवश्यकता आहे. नाहीतर भारतीयांना आंतरराष्ट्रीय स्तरावर फटकारले जाउ शकते.

आपल्या विदेश नीतीमध्ये अनेक पळवाटा आहेत. पंतप्रधान आणि विदेश मंत्र्यांनी याबाबत सदनात निवेदन देउन त्याबाबत सविस्तर चर्चा घडवून आणली पाहिजे.